# ८ कंपनीच्या सभा – भाग २

८.१ सभांचे प्रकार
- ८.१.१ भागधारकांच्या सभा
  - (अ) सर्वसाधारण सभा
    - १) वार्षिक सर्वसाधारण सभा
    - २) विशेष सर्वसाधारण सभा
  - (ब) विशिष्ट वर्गाच्या सभा
- ८.१.२ संचालकांच्या सभा
  - १) संचालक मंडळाची सभा
  - २) समितीच्या सभा
- ८.१.३ धनकोंच्या सभा


८.२ वार्षिक सर्वसाधारण सभेच्या संदर्भात चिटणिसाची कार्ये

८.३ फरक
- १) भागधारकांच्या सभा – संचालक मंडळाच्या सभा
- २) वार्षिक सर्वसाधारण सभा – विशेष सर्वसाधारण सभा

**प्रस्तावना :**

संयुक्त भांडवली प्रमंडळामध्ये मालकी आणि व्यवस्थापन यांचे विभाजन झालेले असते म्हणून कंपनीला भागधारकांच्या आणि संचालक मंडळाच्या काही प्रकारच्या सभा भरविण्याची गरज असते.

## ८.१ सभांचे प्रकार :




### ८.१.१ भागधारकांच्या सभा :

भागधारक कंपनीच्या व्यवस्थापनात सहभाग घेतात ते भागधारकांच्या सभांमध्ये सहभाग घेऊन कंपनीचा कारभार पाहण्याचा हक्क बजावतात. विविध गोष्टींविषयी चर्चा करून निर्णय घेण्यासाठी भागधारकांच्या सभा आयोजित केल्या जातात.

**अ) सर्वसाधारण सभा :** या समहक्क भागधाकरांच्या सभा असतात. त्यांचे वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभा असे दोन प्रकार आहेत.

**१) वार्षिक सर्वसाधारण सभा (कलम ९६) :** वार्षिक सर्वसाधारण सभा ही समहक्क भागधारकांची प्रत्येक आर्थिक वर्षात एकदाच भरविली जाणारी सभा आहे.

### वार्षिक सर्वसाधारण सभेचा उद्देश :

वार्षिक सर्वसाधारण सभा प्रत्येक कंपनीला आर्थिक वर्षातील कंपनीच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी व विविध विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेण्यासाठी घेतली जाते. सभेचे उद्देश पुढीलप्रमाणे –

१) वार्षिक आर्थिक हिशेब पत्रके, संचालकांचा वार्षिक अहवाल व हिशेब तपासनिसाचा अहवाल स्वीकारणे व त्यास मान्यता देणे.

२) लाभांश जाहीर करणे.

३) निवृत्त झालेल्या संचालकांच्या जागी नवीन संचालकाची नेमणूक करणे.

४) हिशोब तपासनिसाची नेमणूक करणे व त्याचा मोबदला ठरविणे.

५) कंपनीच्या प्रगतीचा व कामकाजाचा आढावा घेणे.

### कायदेशीर तरतुदी :

**१) वार्षिक सर्वसाधारण सभेचा कालावधी :**

**अ) पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा :** कंपनीचे पहिले आर्थिक वर्ष संपल्यानंतर ९ महिन्यात पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा बोलविली जाते.

**ब) पुढील वार्षिक सर्वसाधारण सभा :** पुढील प्रत्येक वार्षिक सर्वसाधारण सभा कंपनीचे आर्थिक वर्ष संपल्यानंतर ६ महिन्यात घेतली पाहिजे.

**क) दोन वार्षिक सभेतील अंतर :** दोन वार्षिक सभेतील अंतर १५ महिन्यांपेक्षा जास्त असता कामा नये.

**ड) वार्षिक सर्वसाधारण सभेची मुदतवाढ :** नोंदणी अधिकाऱ्याला कंपनीला योग्य कारणासाठी वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याच्या मुदतीमध्ये जास्तीत जास्त ३ महिन्याची मुदत वाढ देण्याचा अधिकार असतो तथापि नोंदणी अधिकाऱ्याला पहिल्या वार्षिक सर्वसाधारण सभेस मुदतवाढ देता येत नाही. एक व्यक्ती कंपनीला वार्षिक सर्वसाधारण सभा घेणे बंधनकारक नाही.

**२) सभा बोलविणारी अधिकारी व्यक्ती :** वार्षिक सर्वसाधारण सभा योग्य प्रकारे बोलविण्याचा अधिकार संचालक मंडळाला असतो.

**३) सभेची सूचना :** चिटणिसाला प्रत्येक सभासदाला त्याच्या अधिकृत पत्त्यावर सभेची सूचना सभेच्या किमान २१ दिवस अगोदर पत्राद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे पाठवावी.

**४) वार्षिक सर्वसाधारण सभेचा दिवस, वेळ व ठिकाण :** प्रत्येक वार्षिक सर्वसाधारण सभा कंपनीच्या नोंदविलेल्या कार्यालयात किंवा इतर ठिकाणी कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय असलेल्या शहरात कामकाजाच्या दिवशी (राष्ट्रीय सुट्टीचा दिवस सोडून) कामकाजाच्या वेळेत म्हणजे सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत घेण्यात आली पाहिजे.

**५) गणसंख्या :** कंपनी कायदा २०१३ नुसार सार्वजनिक कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची गणसंख्या खालीलप्रमाणे आहे.

| सभासदांची संख्या | गणसंख्या |
|---|---|
| १००० पेक्षा कमी | पाच सभासद |
| १००० पेक्षा जास्त परंतु ५००० पर्यंत | पंधरा सभासद |
| ५००० पेक्षा जास्त | तीस सभासद |

खाजगी कंपनीच्या बाबतीत किमान दोन सभासद वैयक्तिकरित्या हजर असणे ही गणसंख्या आहे.